OK

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि. ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( नगर सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय मा.स्थायी समिती सभा
दि. २३/०४/२०१२

मुळप्रत

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण क्र १ ते ५

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त-१/ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०९/०४/२०१२.

## मा. स्थायी समिती सभा

**सभा सूचना क्र. :- ०१ दिनांक · ०९/०४/२०१२**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

स्थायी समिती सदस्य/सदस्या,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. १३/०४/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. ०९/०४/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्थायी समिती सभा सुचना क्रमांक ०१, दि. ०९/०४/२०१२ सोबतची विषय पत्रिका**
**सभा शुक्रवार दि. १३/०४/२०१२**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ०१ | दि. ०९/०३/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** - निरंक. |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** - |
| ०२ | भाईंदर (प.) प्रभाग समिती क्र.१ कार्यालया समोर असलेल्या इमारतीमध्ये गाळा क्र. १४ हिंदू वैकुंठधाम सामुग्री भांडार यांना भाड्याने देण्याची मुदत वाढविणेबाबत. |
| ०३ | अग्निशमन दलातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना गणवेश व इतर साहित्य खरेदी करणेबाबत. |
| ०४ | मिरा भाईंदर महानगरपालिकेतील विविध विभागातील उपलब्ध असलेल्या प्रिंटरसाठी कन्झुमेबल स्टेशनरी पुरवठा करणे. |
| ०५ | निविदांस मान्यता देणे. (सार्व. बांधकाम विभाग) |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** - निरंक |

**दिनांक :- ०९/०४/२०१२.**

(वासुदेव शिरवळकर)
प्र. नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मा. स्थायी समिती सभा

# दि. ०९/०३/२०१२

# रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०९/०३/२०१२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक ०९/०३/२०१२ रोजी सभा सुचना क्र. २४ दि. ०२/०३/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात दुपारी १२.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती, श्रीम. कल्पना महेश म्हात्रे ह्या उपस्थित होत्या. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | सभापती |
| २. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सदस्य |
| ३. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| ४. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ५. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| ६. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |
| ७. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ८. | श्री. शफिक अहमद सादत खान | सदस्य |
| ९. | श्री. जुबेर इनामदार | सदस्य |
| १०. | श्री. अनिल दिवाकर सावंत | सदस्य |
| ११. | श्रीम. नयना म्हात्रे | सदस्या |
| १२. | श्रीम. मर्लिन डिसा | सदस्या |
| १३. | श्री. मधुसुदन पुरोहित | सदस्य |
| १४. | श्री. अग्रवाल ओमप्रकाश | सदस्य |
| १५. | श्रीम. नर्मदा वैती | सदस्या |
| १६. | श्री. बर्नड अल्बर्ट डिमेलो | सदस्य |

**गैरहजर सदस्य – निरंक**

**मा. सभापती :-**

नमस्कार, स्थायी समितीच्या सर्व सदस्यांना कर्मचाऱ्यांना होळीच्या शुभेच्छा देते. तसेच महिला सदस्यांना महिला दिनाच्या शुभेच्छा देते आणि सचिव साहेबांना विनंती करते की, सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. ०९/०३/२०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. २४, दि. ०२/०३/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १४४, दि. ०१/०२/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**लक्ष्मण जंगम :-**

पान क्र. ४४ मध्ये वक्तव्य आहे. तुमची भुमिका काय राहणार तर तिथे त्यांची भुमिका काय राहणार?

**भगवती शर्मा :-**

दि. ०१/०२/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**अनिल सावंत :-**

मा. सभापती मॅडम, मागच्या ५-६ मिटींग पुर्वी स्थायी समिती मध्ये सुद्धा मा. महासभेप्रमाणे अवलोकन अहवाल प्रशासन देणार होते ते अजुनपर्यंत देत नाही. तर त्याचं काय झालं? आपले जे ठराव होतात त्याचे इम्प्लीमेंन्टेशन कोणी करायचं? कशाप्रकारे इम्प्लीमेंन्टेशन करणार आहेत? कारण, ह्या इतिवृत्तांतामध्ये जे ठराव

स्टॅंडींग कमिटी मध्ये पास झाले मा. महासभेमध्ये त्याच्या विरोधात काही ठराव मांडले गेले तर आता एक्झॅक्टली पोजिशन काय आहे? स्टॅंडींग कमिटीच्या ठरावाच्या आणि प्रशासन अवलोकन अहवाल कधी देणार आहे?

**मा. सभापती :-**

पुढच्या स्थायी समितीमध्ये अवलोकन अहवाल द्यायला सांगते.

**प्रकरण क्र. १४४ :-**

दि. ०१/०२/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १२४ :-**

दि. ०१/०२/२०१२ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४५, सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ "अ" + "क" + "अग्निशमन" + "अंध व अपंग" + "महिला व बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे. प्रकरण क्र. १४६, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

साहेब, आपल्या भाईंदरच्या सर्व.पत्रकार बंधुंची अपेक्षा आहे की, सभागृहामध्ये जे बजेट पेश होत आहे त्याबाबत त्यांना फोटो काढल्यास परवानगी द्यावी. मी सभापती मॅडमना विनंती करेन की, आपल्या सर्व पत्रकारांना आतमध्ये बोलवून घ्यावे आणि त्यांना फोटो काढण्यासाठी सांगावे.

**मा. सभापती :-**

ठिक आहे बोलवून घ्या.

**(अंदाजपत्रक १२.१५ वा. सादर.करण्यात आले.)**

**मा. आयुक्त :-**

सन २०१२-१३ चं जे अंदाजपत्रक आहे ते आता मी स्थायी समिती समोर ठेवलेलं आहे आपण सगळ्यांना माहित आहे की, या वर्षी कोणतीही कर वाढ आपल्या मार्फत काही मंजुर नाही झाली. कोणत्यामध्ये नवीन कर नाही. एकुण बजेट जवळपास ९०० कोटी चा आहे आणि अपेक्षित खर्च ८९९ कोटी ९० लाख म्हणजे ११ लाखाचा शिल्लक बजेट मी आज स्टॅंडींग समोर ठेवतो त्याच्यामध्ये प्रामुख्याने यावर्षी भुयारी गटार योजना आमची जी आहे ते पुर्ण होणं अपेक्षित आहे त्याच्यात्त सर्वात मोठा २७० कोटी यावर्षी खर्च होणार आहे तसेच उत्पन्न जर पाहिलं तर एलबीटी, प्रॉपर्टी टॅक्स याच्यामध्ये १५ ते २० टक्के ची वाढ आम्ही दाखवतो आम्हाला अपेक्षा आहे की, यावर्षी २०-२० टक्के तरी त्याच्यामध्ये प्राप्त होणार पण कोणताही नविन टॅक्स यावर्षी नाही हे ह्याचं एक ठळक वैशिष्ट्य आहे. कॉम्प्युटरायजेशन साठी आम्ही मागच्यावर्षी पेक्षा दुप्पट निधी ठेवलेला आहे तसेच घनकचरा व्यवस्थापनासाठी जवळपास दुप्पट निधी आहे सबवे जे भाईंदरचं तयार होत आहे ते सुद्धा यावर्षी पुर्ण होण्याची शक्यता आहे त्यासाठी आम्ही १८ कोटी रुपये ठेवलेलं आहे टेंभा हॉस्पीटल आहे ते सुद्धा पुर्ण होण्याची शक्यता आहे त्यासाठी पण ४ कोटी रुपये ठेवलेलं आहे शिक्षण मंडळ, प्रभाग समिती निधी, दुर्बल घटक, महिला बालकल्याण यासाठी जशी तरतुद आहे त्याप्रमाणे ५ टक्के बजेट हे सगळ्या हेडसाठी आम्ही ठेवलेला आहे. आमच्याकडे एमएमआरडीए चं कर्ज परतफेड सुद्धा आहे. यावर्षी जवळपास १८० कोटी कर्ज एमएमआरडीए ला परत करणार आहोत पण एकंदरीत पाहिलं तर असं दिसते की, आमची स्थिती जी आहे दाईत्व वाढतात लायबिलीटीज वाढतात मिरा भाईंदर कॉर्पोरेशनवर आणि आगामी काळात आमच्या उत्पन्नाचे सोर्स वाढवून उत्पन्न वाढवून आम्ही पुढे जाऊ शकतो यासाठी काही ठिकाणी सक्त निर्णय घ्यावे लागणार आहे कारण सध्या जी स्थिती आहे त्याच्यामध्ये जे आमच्याकडे नविन योजना करायची असेल तर आमच्याकडे तेवढे उत्पन्न दिसत नाही म्हणून नविन उत्पन्न तयार करण्याची फार गरज आहे आणि या प्रमाणेच आम्ही सगळ्यांनी मिळुन थोडे ठोस निर्णयपण घ्यावे लागणार धन्यवाद ।

**मा. सभापती :-**

(निवेदनाचे वाचन केले) सर्व पक्षाचे गटनेते आज या मिटींगमध्ये हजर आहे बजेट सादर करत असताना प्रत्येक सदस्याला मी ५-१० मिनिटे देईन त्याच्यात तुमचे पॉईंट्स सांगावे आणि मग तुमचे बजेट सादर करावे अशी मी विनंती करते.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, स्थायी समितीची प्रथा राहीलेली आहे की, चर्चा सत्र आपण बजेटचं ठेवतो सदस्यांना घेऊन असा प्रोग्राम तुम्ही लावणार की नाही?

**मा. सभापती :-**

तुम्हाला दोन दिवसात सांगते.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, माझी अशी सुचना आहे या. स्थायी समितीमध्ये एक चांगली गोष्ट अशी आहे की, प्रत्येक पक्षाचे गटनेते आहे म्हणजे आघाडीचे पक्षाचे गटनेते आहे त्यांची अशी सुचना आहे की, बजेट नक्कीचं जे आयुक्त साहेबांनी दिलेलं आहे आपण त्यांच्या कार्याची पध्दत बघतो मागच्या सहा महिन्यापासुन तर त्यांनी दिलेल्या बजेटमध्ये फार मोठा अंतर आपल्यामध्ये होणार नाही अशी माझी अपेक्षा आहे तरी प्रत्येक गटनेत्यांनी आपल्या पध्दतीने त्याच्यावर सविस्तर आपण इकडे आल्यानंतर काही गोष्टी बघतो याच्यापेक्षा २ दिवस आधी हे आपण सर्वांनी बघुन घ्यावे आणि आपण २-३ दिवसानंतर कार्यक्रम घ्यावा जेणेकरुन जास्त वेळ जाणार नाही या बजेटमध्ये कारण पुढे मा. महासभा लावायची आहे आणि मार्च शेवटचं म्हणुन मा. महासभेमध्ये ताबडतोब निर्णय होणे पण गरजेचे आहे म्हणुन सर्वांना माझी विनंती आहे अशी आपल्याकडुन विनंती झालेली आहे की, गटनेत्यांनी आपल्या पध्दतीने मा. महासभेमध्ये पण मा. महापौर आणि जास्त वेळ मागच्या वेळेला चर्चेसाठी दिली नव्हती म्हणून आपण यावेळी सर्व गटनेत्यांनी सविस्तर याच्यावर अवलोकन करुन आपण जे ठरवु त्यादिवशी त्यांनी आपले विचार मांडावे अशी माझी विनंती आहे

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदया, सभा लावण्याचा अधिकार तुमचा आहे चर्चा सत्र लावण्याचा अधिकार ही तुमचा आहे चर्चा सत्र लावला. प्रत्येक पक्षाचे प्रतिनिधी आहे आपला एक विषय आणि त्यांची ते बाजु मांडतील स्थायी समितीने मान्य केलेल्या बजेटला मा. महासभेमध्ये जास्त वेळ वाया न घालवता आपण तिथे मान्यता देऊ शकतो. जास्तीत जास्त चर्चा करायची असेल तर स्थायी समितीमध्ये झाली पाहिजे प्रत्येक विषयाची-चर्चा आपण करु शकतो.

**मा. सभापती :-**

प्रत्येक सदस्यांना तसा वेळ दिला जाईल.

**जुबेर इनामदार :-**

नेहमी इतिहास राहिलेला आहे. ४-५ दिवसाचा सत्र चालतो. प्रत्येक विषयावर प्रत्येक विभागाच्या लोकांना इथे बोलवलं जाते त्यावर चर्चा करुन सविस्तर आकडे ठेवतो जे आपल्याला ठेवायचे आहे ते तर माझी आपल्याला विनंती आहे प्रथा आहे ती चालु द्या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे आपण ठरवूया.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४७, शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

**(शिक्षण सभापती साहेबांनी मा. स्थायी समितीमध्ये बजेट सादर केले)**

**सुरेश दळवी (शिक्षण उपसभापती) :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या वतीने २०१२-१३ सुधारीत मुळ अंदाजपत्रक स्थायी समितीमध्ये आम्ही याठिकाणी सादर करीत आहोत स्थायी समिती सभापती व सर्व सन्मा. स्थायी समितीचे सदस्य यांना विनंती राहील की, शिक्षण विभागासारख्या महत्वाच्या विभागावर आपण जे आपल्यासमोर बजेट सादर केलेलं आहे त्याला आपण मंजुरी द्यावी. जवळपास २० करोड २८ लाखाचं बजेट आपल्यासमोर मी सादर केलेलं आहे शहराच्या एकुण बजेटच्या समोर हे २० करोडचं बजेट आपल्यासमोर सादर करताना मला आनंद होत आहे कारण या शहराच्या जवळपास १० हजार गरीब विद्यार्थ्यांच्या हितासाठी शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी जे काम शिक्षण मंडळाच्या माध्यमातुन आपण करत आहोत मग त्यांना विविध भौगोलिक सुविधा असु दे किंवा त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी विविध उपक्रम राबवण्याचं काम आमच्या शिक्षण मंडळाच्या माध्यमातुन आम्ही या ठिकाणी करत आहोत मी आपल्या सर्व सदस्यांना विनंती करेन की, आपण हे बजेट मंजुर करावं धन्यवाद. जय हिंद जय महाराष्ट्र. त्याचं बरोबर गेल्या पाच वर्षामध्ये महानगरपालिकेचं शिक्षण मंडळाचं बजेट हे आम्ही सादर करत असताना सुद्धा काही अडचणी अशा येतात की, हे बजेट आम्हाला शिक्षण मंडळाकडे वर्ग न होता त्याची संपूर्ण जी काय अंमल बजावणी होती ती प्रशासन स्तरावर या ठिकाणी केली जाते. शिक्षण मंडळाच्या वतिने माझी विनंती राहील की, जे बजेट आम्ही सादर करतो ते संपूर्ण बजेट मंजूर झाल्यानंतर

शिक्षण मंडळाकडे वर्ग करण्यात यावे. या संदर्भात सुध्दा स्थायी समितीने या ठिकाणी आम्हाला सहकार्य करावे. धन्यवाद.

**नयना म्हात्रे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलते, आता सगळे सदस्य आहेत म्हणून सगळयां सदस्यांनी आपल्या शाळेत फिरावे. मला वाटते ३६ शाळा महापालिकेच्या आहेत. सदस्यांनी जास्त नको पण १५ दिवसांनी एकदा शाळेवर तरी गेल पाहिजे. कारण, आपल्या शिक्षकांची वेळ आहे १०.५० ची ११.३० वाजतात तरी शिक्षिका जात नाही. आता मुलांच्या परिक्षा चालू होतील. तर शिक्षकांना काही बंधनच नाही. तर तुम्ही सदस्यांनी जर प्रत्येक शाळेवर फेरी मारली तर शिक्षकांना तुमची वचक राहील. की, सदस्य येवून फेरी मारुन जातात. कारण, कोणाला पगार ३५ हजार तर कोणाला ४० हजार असा आहे. तर माझी तुम्हाला अशी विनंती आहे की, तुम्ही आठ दिवसाने पंधरा दिवसांनी शाळेवर फेऱ्या मारल्या पाहिजे.

**सुरेश दळवी (शिक्षण उपसभापती) :-**

या संदर्भात शिक्षण मंडळाच्या सर्व सदस्यांना संपूर्ण शाळा विभागुन देण्यात आलेल्या आहेत. आणि शिक्षण मंडळ सदस्य आपआपल्या परिने मग ते सकाळच्या सत्रामध्ये असु दे किंवा दुपारच्या सत्रामध्ये जेव्हा जेव्हा वेळ मिळेल तेव्हा तेव्हा त्यांना भेटी देवून तिथल्या अडचणी तिथल्या ज्या काही समस्या आहे त्या मांडण्याचा प्रयत्न करतात. आपल्या सुचना आम्ही निश्चित पण करु आणि येणाऱ्या काळामध्ये अंमलबजावणी करु.

**नयना म्हात्रे :-**

ठिक आहे. धन्यवाद.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. सभापती मॅडम, मागच्या दोन वर्षापासून शिक्षण समितीचे सभापती ते आग्रह करतात की त्यांची बजेट मध्ये जी तरतुद होती त्यांना वर्ग करावी. मी सर्व सन्मा. नगरसेवकांना विनंती करतो. आपण जेव्हा शेवटची मंजुरी देवू, त्या ठरावामध्ये तसा उल्लेख सर्वांनी एकमताने करावा. मग मा. आयुक्त साहेब काय डिसिजन घेतील ती वेगळी गोष्ट आहे. पण त्याच्यामध्ये आपण एकत्र निर्णय घेतला तर त्यांना जरा इजी होईल तशी सर्वांना माझी विनंती आहे. शिक्षणाचा जो बजेट आहे. त्यांच्यासाठी वेळ देण्यासाठी आपण सहकार्य करावे अशी माझी इच्छा आहे.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती मॅडमच्या परवानगीने बोलतो, हा लास्ट इयरमध्ये निर्णय झालेला होता तर त्याची अंमलबजावणी आपण सुरु केलेली आहे. आपला विशेष शिक्षण कर जो जमा होतो तो वेळोवेळी त्यांच्या खात्यावर जमा केला जातो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

खर्च आर्थिक मंजुरी ते नाही.

**शरद बेलवटे :-**

स्वातंत्र्य त्यांना आहे. परंतु, त्यांना आम्ही सांगितल होत की, तुमचा अकाऊंट ब्रांच एक तयार करा. तिथे एक आय.टी. चा नंबर तुम्ही काढुन घ्या. कारण त्यांना पॅन नं. स्वतःचा घ्यावा लागेल. तर ते ह्या वर्षी काही करणार आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

ठिक आहे तस तुम्ही त्यांना कळवा आणि कळवून जी आहे ती पध्दत सांगा.

**शरद बेलवटे :-**

त्यांना तस कळवलेल आहे.

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४८, परिवहन सेवेचे सन २०११-१२ चे सुधारीत व सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

(परिवहन सेवेचे अंदाजपत्रक मा. आयुक्तांनी स्थायी समिती सभेमध्ये सादर केले.)

**प्र. नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १४९, प्रभाग समितीनिहाय साफसफाई कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये दैनंदिन साफसफाई व दररोज निघणारा कचरा गोळा करुन वाहतुक करणे कामाची प्रभाग समिती निहाय ०१ ते ०४ करीता दि. २२/९/२०११ रोजी जाहिर निविदा नोटीस प्रसिध्द करून ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने निविंदा मागविण्यात आल्या होत्या.

प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी सादर केलेले दर जादा असल्याने दि. २०/०१/२०१२ रोजी ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता खालीलप्रमाणे वाटाघाटी नंतर दर सादर केले आहे.

प्रभाग समिती क्र. ०१ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | ०८ | रु. १,१५,२००/- | रु. ६६,४००/- |
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०४ | रु. २०,०१६/- | रु. १२,८४०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | ०२ | रु. १२,००६/- | रु. ८,१७८/- |
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १२,०००/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. २४,०००/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | ३५७६ (४४७) | रु. १,४३,५२०/- | रु. १,१८,३२०/- २७८४ (३४८) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर ) | - | रु. ४०,०००/- | रु. ३,५२०/- प्रती तास (७९२ मनुष्यतासाचे काम यांत्रिक पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास . नियंत्रण कार्यक्रम | ४९६ (६२) | रु. ३१,०००/- | रु. २०,८३२/- ४९६ (६२) |

प्रभाग समिती क्र. ०२ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | ०८ | रु. १,१५,२००/- | रु. ६६,४००/- |
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०४ | रु. २०,०१६/- | रु. १२,८४०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | १२ | रु. ७२,०३६/- | रु. ४९,०६८/- |
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १२,०००/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. २४,०००/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | ३५६८ (४४६) | रु. १,४३,०४०/- | रु. १,१७,९८०/- २७७६ (३४७) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर) | - | रु. ४०,०००/- | रु: ३,५२०/- प्रती तास (७९२ मनुष्यतासाचे काम यांत्रिक पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | ५४४ (६८) | रु. ३४,०००/- | रु. २२,८४८/- ५४४ (६८) |

प्रभाग समिती क्र. ०३ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | १३ | रु. १,८७,२००/- | रु. १,०७,९००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०३ | रु. १५,०१२/- | रु. ९,६३०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | ०५ | रु. ३०,०१५/- | रु. २०,४४५/- |
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १२,०००/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. २४,०००/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | ४२६४ (५३३) | रु. १,८४,३२०/- | रु. १,४४,५००/- ३४०० (४२५) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर ) | - | रु. ४०,०००/- | रु. ३,५२०/- प्रती तास (८६४ मनुष्यतासाचे काम यांत्रिक पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास , नियंत्रण कार्यक्रम | ५२० (६५) | रु. ३२,५००/- | रु. २१,८४०/- ५२० (६५) |

**प्रभाग समिती क्र. ०४ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.**

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | १३ | रु. १,८७,२००/- | रु. १,०७,९००/- |
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०२ | रु. १०,००८/- | रु. ६,४२०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | ०५ | रु. ३०,०१५/- | रु. २०,४४५/- |
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १,५०३/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. ३,००६/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | २२९६ (२८७) | रु. ६२,५००/- | रु. ७८,२००/- १८४० (२३०) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर ) | - | रु. ४०,०००/- | रु. ३,५२०/- प्रती तास (४५६ मनुष्यतासाचे काम यांत्रिक पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | ४३२ (५४) | रु. २७,०००/- | रु. १८,१४४/- ४३२ (५४) |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी प्रभाग समिती क्र. ०१ करीता एकुण वार्षिक रु.८,६०,७७,२५०/-, प्रभाग समिती क्र. ०२ करीता एकुण वार्षिक रु.१०,१६,१३,८४०/, प्रभाग समिती क्र. ०३ करीता एकुण वार्षिक रु.११,४४,५४,१७५/-, प्रभाग समिती क्र. ०४ करीता एकुण वार्षिक रु.८,७७,३३,९८५/- दर सादर केला आहे. प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता एकुण वार्षिक खर्च रु. ३८,९८,७९,२५०/- आहे. यांस हि सभा मंजुरी देत आहे. त्याचप्रमाणे प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता जे.सी.बी. व पोकलन मशिनसाठी वर नमुद केलेल्या दरात आवश्यकतेनुसार घेणेस हि सभा मंजुरी देत आहे.

ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांची प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई कामाच्या निविदेस मंजुरीच्या अधिन राहुन खालील बाबी समाविष्ट करण्यात येत आहे.

१) निविदेत दिलेल्या दरात केंद्र सरकार तर्फे भविष्यात लागु होणा-या सर्व्हीस टॅक्सचा उल्लेख केलेला नाही. केंद्र सरकार / राज्य शासनातर्फे सर्व्हीस टॅक्स लागु झाल्यास सदरची रक्कम महापालिकेतर्फे देण्यात येईल.
२) मनुष्यबळ /यांत्रिकी तास याचा दर प्रती दिवसाकरीता दिलेला आहे. १०८०० मनुष्यतास व २९०४ यांत्रिक पध्दतीने म्हणजेच ७९% व २१% मनुष्यबळ व यांत्रिक पध्दतीने दोन मेकॅनिकल स्विपरद्वारे कामे प्रत्येक प्रभाग मध्ये आवश्यकतेनुसार पुर्ण करण्यात यावे.
३) प्रभाग समिती निहाय दैनंदिन साफसफाईची कामे समाधानकारक न झाल्यास प्रती दिन प्रती ठिकाणी रु.३०००/- निविदातील अटीशर्तीनुसार दंड आकारण्यात यावे.

प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी सादर केलेल्या निविदा मंजुरी करीता ठरावामध्ये खालीलप्रमाणे सुचनेचा समावेश करण्यात यावा.

अ) प्रभाग समिती निहाय दैनंदिन साफसफाईची कामे समाधानकारक न झाल्यास प्राप्त तक्रारीची तपासणी स्वच्छता निरिक्षकामार्फत करण्यात यावी. तक्रारीचे निवारण कंत्राटदाराकडून दोन तासात करण्यात यावे. संबंधित स्वच्छता निरिक्षकांनी कळवूनही कंत्राटदाराने दोन तासात तक्रारीचे निवारण न केल्यास व याप्रमाणे वर्षाला २० तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित कंत्राटदाराचे त्या प्रभाग समितीचे दैनंदिन साफसफाईचे कामांबाबत मा. आयुक्त यांचे निदर्शनास आणुन कडक कारवाई करणेचे अधिकार देण्यात येत आहे.
ब) प्रभाग समिती निहाय दैनंदिन साफसफाईची कामाचे प्रथम वर्षाची एकुण वार्षिक रक्कमेच्या १०% रक्कम दुस-या वर्षापासून प्रती वर्ष कंत्राटदारास देण्यात यावी.

प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी पाच वर्षासाठी दैनंदिन प्रभाग समिती निहाय साफसफाई करणे कामाच्या निविदेस वरीलप्रमाणे सुचेनेचा समावेश करुन हि सभा मंजुरी देत आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

माझे अनुमोदन आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. सभापती महोदय, माझी एक छोटीशी सुचना आहे. वाचताना दोन नंबर पॅरेग्राफ मध्ये मनुष्यबळ यांत्रिक तास याचा दर प्रति दिवसा करीता दिलेला आहे. १०,८०० मनुष्य तास व २००० असे यांत्रिक पध्दती म्हणजे ७९ व २१ मनुष्यबळ यांत्रिक पध्दतीने दोन मॅकेनिकल स्विपर द्वारे कामे प्रत्येक प्रभाग समितीमध्ये आवश्यकतेनुसार पूर्ण करण्यात यावी. माझी एवढी सुचना समावेश करुन घ्यावी.

**मा. सभापती :-**

सुचनेसह ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४९ :-**

प्रभाग समितीनिहाय साफसफाई कामाच्या निविदेस मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. १२५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये दैनंदिन साफसफाई व दररोज निघणारा कचरा गोळा करुन वाहतुक करणे कामाची प्रभाग समिती निहाय ०१ ते ०४ करीता दि. २२/९/२०११ रोजी जाहिर निविदा नोटीस प्रसिध्द करून ई-टेंडरींग ऑनलाईन पध्दतीने निविदा मागविण्यात आल्या होत्या.

प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी सादर केलेले दर जादा असल्याने दि. २०/०१/२०१२ रोजी ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता खालीलप्रमाणे वाटाघाटी नंतर दर सादर केले आहे.

**प्रभाग समिती क्र. ०१ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.**

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | ०८ | रु. १,१५,२०६/- | रु. ६६,४००/- |
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०४ | रु. २०,०१६/- | रु. १२,८४०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | ०२ | रु. १२,००६/- | रु. ८,१७८/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १२,०००/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. २४,०००/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | ३५७६ (४४७) | रु. १,४३,५२०/- | रु. १,१८,३२०/- २७८४ (३४८) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर ) | - | रु. ४०,०००/- | रु. ३,५२०/- प्रती तास (७९२ मनुष्यतांसाचे काम यांत्रिकं पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | ४९६ (६२) | रु. ३१,०००/- | रु. २०,८३२/- ४९६ (६२) |

प्रभाग समिती क्र. ०२ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | ०८ | रु. १,१५,२००/- | रु. ६६,४००/- |
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०४ | रु. २०,०१६/- | रु. १२,८४०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | १२ | रु. ७२,०३६/- | रु. ४९,०६८/- |
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १२,०००/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. २४,०००/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०२ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | ३५६८ (४४६) | रु. १,४३,०४०/- | रु. १,१७,९८०/- २७७६ (३४७) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर) | - | रु. ४०,०००/- | रु. ३,५२०/- प्रती तास (७९२ मनुष्यतासाचे काम यांत्रिक पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | ५४४ (६८) | रु. ३४,०००/- | रु. २२,८४८/- ५४४ (६८) |

प्रभाग समिती क्र. ०३ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | १३ | रु. १,८७,२००/- | रु. १,०७,९००/- |
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०३ | रु. १५,०१२/- | रु. ९,६३०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | ०५ | रु. ३०,०१५/- | रु. २०,४४५/- |
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १२,०००/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. २४,०००/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०३ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | ४२६४ (५३३) | रु. १,८४,३२०/- | रु. १,४४,५००/- ३४०० (४२५) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर ) | - | रु. ४०,०००/- | रु. ३,५२०/- प्रती तास (८६४ मनुष्यतासाचे काम यांत्रिक पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | ५२० (६५) | रु. ३२,५००/- | रु. २१,८४०/- ५२० (६५) |

***प्रभाग समिती क्र. ०४ करीता खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.***

| प्रभाग समिती क्र. | क्र. | कामाचा तपशिल | वाहनांची संख्या | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | १ | कॉम्पॅक्टर (६ ते ७ टन मजुरासह) प्रती दिवस | १३ | रु. १,८७,२००/- | रु. १,०७,९००/- |
| | २ | मिनी टीपर ट्रक (१.५ टन मजुरासह) प्रती दिवस | ०२ | रु. १०,००८/- | रु. ६,४२०/- |
| | ३ | मिनी टीपर बंद बॉडी (३ टन मजुरासह) प्रती दिवस | ०५ | रु. ३०,०१५/- | रु. २०,४४५/- |
| | ४ | जे.सी.बी प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. १,५०३/- | रु. ९,०००/- (०८ तास) |
| | ५ | पोकलन प्रती दिवस (आवश्यकतेनुसार) | ०१ | रु. ३,००६/- | रु. १८,०००/- (०८ तास) |

| प्रभाग समिती क्र. | क्र | कामाचा तपशिल | अंदाजीत आवश्यक मजुर तास/ दिवस | निविदेतील दर | वाटाघाटी नंतर सादर केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| ०४ | १ | मनुष्यबळ तास/ प्रती दिन मजुर | २२९६ (२८७) | रु. ६२,५००/- | रु. ७८,२००/- १८४० (२३०) |
| | २ | यांत्रीकी (किमान एक मेकॅनिकल स्विपर ) | - | रु. ४०,०००/- | रु. ३,५२०/- प्रती तास (४५६ मनुष्यतासाचे काम यांत्रिक पध्दतीने करण्यात येईल) |
| | ३ | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | ४३२ (५४) | रु. २७,०००/- | रु. १८,१४४/- ४३२ (५४) |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी प्रभाग समिती क्र. ०१ करीता एकुण वार्षिक रु.८,६०,७७,२५०/-, प्रभाग समिती क्र. ०२ करीता एकुण वार्षिक रु.१०,१६,१३,८४०/, प्रभाग समिती क्र. ०३ करीता एकुण वार्षिक रु.११,४४,५४,१७५/-, प्रभाग समिती क्र. ०४ करीता एकुण वार्षिक रु.८,७७,३३,९८५/- दर सादर केला आहे. प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता एकुण वार्षिक खर्च रु. ३८,९८,७९,२५०/- आहे. यांस हि सभा मंजुरी देत आहे. त्याचप्रमाणे प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता जे.सी.बी. व पोकलन मशिनसाठी वर नमुद केलेल्या दरात आवश्यकतेनुसार घेणेस हि सभा मंजुरी देत आहे.

ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांची प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता प्रभाग निहाय वॉर्ड साफसफाई कामाच्या निविदेस मंजुरीच्या अधिन राहुन खालील बाबी समाविष्ट करण्यात येत आहे.

१) निविदेत दिलेल्या दरात केंद्र सरकार तर्फे भविष्यात लागु होणा-या सर्व्हीस टॅक्सचा उल्लेख केलेला नाही. केंद्र सरकार / राज्य शासनातर्फे सर्व्हीस टॅक्स लागु झाल्यास सदरची रक्कम महापालिकेतर्फे देण्यात येईल.

२) मनुष्यबळ /यांत्रिकी तास याचा दर प्रती दिवसाकरीता दिलेला आहे. १०८०० मनुष्यतास व २९०४ यांत्रिक पध्दतीने म्हणजेच ७९% व २१% मनुष्यबळ व यांत्रिक पध्दतीने दोन मेकॅनिकल स्विपरद्वारे कामे प्रत्येक प्रभाग मध्ये आवश्यकतेनुसार पुर्ण करण्यात यावे.

३) प्रभाग समिती निहाय दैनंदिन साफसफाईची कामे समाधानकारक न झाल्यास प्रती दिन प्रती ठिकाणी रु.३०००/- निविदातील अटीशर्तीनुसार दंड आकारण्यात यावे.

प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी सादर केलेल्या निविदा मंजुरी करीता ठरावामध्ये खालीलप्रमाणे सुचनेचा समावेश करण्यात यावा.

अ) प्रभाग समिती निहाय दैनंदिन साफसफाईची कामे समाधानकारक न झाल्यास प्राप्त तक्रारीची तपासणी स्वच्छता निरिक्षकामार्फत करण्यांत यावी. तक्रारीचे निवारण कंत्राटदाराकडून दोन तासात करण्यात यावे. संबंधित स्वच्छता निरिक्षकांनी कळवूनही कंत्राटदाराने दोन तासात तक्रारीचे निवारण न केल्यांस व याप्रमाणे वर्षाला २० तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित कंत्राटदाराचे त्या प्रभाग समितीचे दैनंदिन साफसफाईचे कामाबाबत मा. आयुक्त यांचे निदर्शनास आणुन कडक कारवाई करणेचे अधिकार देण्यात येत आहे.
ब) प्रभाग समिती निहाय दैनंदिन साफसफाईची कामाचे प्रथम वर्षाची एकुण वार्षिक रक्कमेच्या १०% रक्कम दुस-या वर्षापासून प्रती वर्ष कंत्राटदारास देण्यात यावी.

प्रभाग समिती क्र. ०१ ते ०४ करीता ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा. लि. यांनी पाच वर्षासाठी दैनंदिन प्रभाग समिती निहाय साफसफाई करणे कामाच्या निविदेस वरीलप्रमाणे सुचेनेचा समावेश करुन हि सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. ओमप्रकाश अग्रवाल**

